खरीप हंगाम
विशेषांक

# ॲग्रोटेक

मे-जून २०२०|रु ४०/-

आधुनिक शेतकऱ्यांचा सोबती



## नाळेश्वरच्या मैठेंची फुलशेतीत उत्तूंग भरारी

# नाळेश्वरच्या मैत्रेंची फुलशेतीत ऊत्तुंग भरारी

रणरागिणी ही दशभुजाधारी जीवनदायी महिला शेतकरी या उक्तीप्रमाणे महिलांचा शेती कामामधील सहभाग दर्शविला जातो. सद्य परिस्थितीत जमीन मशागतीपासून बियाण्यांचे स्वच्छता आणि पेरणी तसेच आंतरमशागतीचे कार्य, पीक काढणी/काढणीपश्चातची कामे, कापणी, उधळणे, वाळवणे, स्वच्छ करणे, साठवणे सदरील कामात (३२ ते ८४ टक्क्यापर्यन्त) महिलांचा सहभाग असतो.

नांदेड जिल्ह्यातील नाळेश्वर येथील "आदिशक्ति महिला गट" आणि "जयदुर्गा महिला शेतकरी गट" मधील महिलांनी गुलाब, मोगरा, शेवंती, निशिगंध, झेंडू, बिजली व लिली या फुलांची यशस्वी लागवड करून व कृषि विज्ञान केंद्र पोखर्णी नांदेड, कृषि विभाग व आत्मा नांदेड यांच्याकडील उपलब्ध तंत्रज्ञान व ज्ञानाचा उपयोग घेऊन महिलाही पुरुषाच्या बरोबरीने सांघिक कार्याने शेती क्षेत्रात आमुलाग्र बदल करू शकतात याच ज्वलंत उदाहरण या महिला गटांनी दाखवून दिले आहे. फुलशेती सोबतच गटातील इतर महिला सदस्यांना सोबत घेऊन आर्थिक उत्पन्न वाढवून फुलशेतीचा एक नवीन "नाळेश्वर पॅटर्न" विकसीत केला आहे. सदरील यशोगाथामध्ये नाळेश्वर गावामधील या रणरागिणींचा सविस्तर माहितीपट रेखाटला आहे. भविष्यात कृषि योजनांचा अवलंब करून फुलासोबतच भाजीपाल्याचे दर्जेदार रोपे निर्माण करण्याचा त्यांचा संकल्प आहे.



नांदेड तालूक्यातील नाळेश्वरातील संभाजी नामदेवराव मैठे यांनी विविध फुलपिकांची लागवड करुन त्यापासून लक्षावधी रुपये आर्थिक नफा कमावत फूलशेती उद्योगात उत्तुंग भरारी घेतली आहे.

मैठेयांना नाळेश्वर शिवारात गावाच्या पश्चिम दिशेला महादेव मंदिर शेजारी एकूण १ हेक्टर ६ आर जमीन असून त्यांनी आपल्या शेतीत एक शेततळे व एक बोअरवेल खोदून बागायती पिकांच्या सिंचनासाठी सोय करुन घेतली आहे. यात त्यांनी शिर्डी गुलाब २० आर, निशीगंध १० आर, गलांडा ५ आर, पिवळी शेवंती ४ आर अशी फूलपिकांची लागवड केली असून उर्वरीत क्षेत्रात ते ईतर बागायती पिके घेतात. दिवाळी दसऱ्यात ५ गुंठ्यावर झेंडू फुलांची लागवड असते. गत सहा वर्षापासून त्यांचे फूलशेतीत सातत्य आहे. त्यांच्या पत्नी सौ. सुरेखा संभाजी मैठे यांनी गावातील काही महिलांना एकत्रीत करुन "आदिशक्ती महिला" आणि "रेखा सटवाजी वाघ" यांच्या मदतीने "जयदूर्गा बचत गट" स्थापन केले असून यात १५ महिला सदस्य शेतकरी गटाच्या माध्यमातून ते फूलशेती करतात.

### विविध फुलझांडाची लागवड आणि यशस्वीता

मैठे यांचे १२ वी पर्यंत शिक्षण झाल्यानंतर ते पुढे न शिकता शेतीच करु लागले. या पूर्वी ते भाजीपाला व केळी पीक घेत असत. आताही ती पीके ते घेतात. यात त्यांनी २०१६ ला एक एकर क्षेत्रावर जी-९ वाणाच्या केळीची ५ X ५ फूट अंतरावर लागवड केली होती. मैठेंना एक एकर केळीपासून २५० क्विंटल उत्पादन मिळाले. त्यातून जवळपास ८०,००० हजार उत्पादन खर्च आला. उत्पादन खर्च ८०,००० हजार रुपये वजा जाता २,४५,००० (दोन लाख पंचेचाळीस हजार रुपये) निव्वळ उत्पन्न मिळाले होते. या नंतर त्यांनी एक एकर टरबुजही लावले होते परंतू त्याच्यात भावच मिळाला नसल्याने १,२५,००० सवा लाख रुपयाचे नुकसान झाले. मध्यंतरी भाजीपाला पिके घेवू लागले ते विक्रीच्या वेळी त्यांची खांबाळा येथील फूले उत्पादक शेतकरी दत्तराम पाटील यांच्याशी ओळख झाली आणि त्यांनी फुलशेतीस प्रारंभ केला.

### फूलशेतीस केला प्रारंभ व मार्गदर्शन

कृषि विज्ञान केंद्र पोखर्णी नांदेडचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख व उद्यानविद्या तज्ञ डॉ. देवीकांत देशमुख-डोंगरगावकर यांच्या मार्गदर्शनानूसार सुरुवातीला १० गुंठ्यात रंगीबेरंगी गलांडाची लागवड केली. यातून त्यांना १०,०० हजार रुपये उत्पन्न मिळाले तेही कमी पाणी व कमी खर्चात. त्यामूळे त्यांनी फूलशेती क्षेत्रात वाढ केली. सध्या त्यांच्या शेतीत निशीगंध, शिर्डी गुलाब, शेवंती, गलांडा ही फूलझाडे असुन खरीपात दोनवेळा झेंडू घेतात.

### फूलशेतीतील खत, पाणी आणि रोग व्यवस्थापन

निशीगंध, शेवंती, गुलाब, गलांडा, झेंडू या फूलझाडांना वाढीनूसार ते युरिया, १०-२६-२६ डि.ए.पी व काही सुक्ष्म अन्नद्रव्य अशी समप्रमाणात खताची मात्रा देतात. तसेच चार दिवसाआड ठिबकने पाणी दिल्या जाते. तर गुलाब फुलझाडांचा पानावर कोकडा, कळीवर अळी, मावा या किडींचा प्रादुर्भाव होतो. त्यांच्या नियंत्रणासाठी बुरशीनाशक व इत्तर औषधांची फवारणी करतात. शेवंती पिकावर अळी व बुरशी रोगाचा प्रार्दुभाव होत असतो. त्याकरीता केम, साफ, सिक्सर या औषधाची मात्रा फवारावी लागते. या प्रमाणे फूलझाडांचे व्यवस्थापन करतात.

### उत्पादन आणि उत्पन्न

त्यांना ५ गुंठ्यातील निशीगंधाची फूलकळी दररोज ५ किलो, ४ गुंठ्यातील शेवंतीचे रोज १० किलो, ५ गलांडा २५ किलो, शिर्डी गुलाब २० किलो तर खरीपात झेंडूच्या फुलांचे दहा ते २० क्विंटल फूलांचे उत्पादन होते. निशीगंध फूलाला प्रति किलो सरासरी ८० रु, शेवंती ३० रु, गलांडा ३० रु, गुलाब ८० ते १०० रु, झेंडू ३० रु असा दर मिळतो. म्हणजे दररोज फूले विक्रीतून त्यांना सरासरी २००० रु उत्पन्न मिळते. त्यातून ५०० रु उत्पादन खर्च वगळता रोज १५०० रु म्हणजेच महिन्याकाठी ४५००० हजार रुपये उत्पन्न मिळते. यात दराच्या कमी अधिक्तेमुळे उत्पन्न कमी अधिक होत असते. त्यांना सकाळी ५ वाजताच थंड वातावरणात फुलांची काढणी करुन नांदेडच्या फूल मार्केटला नेवुन विक्री करतात. महिला बचत गटातील सदस्यांची देखील फूलशेती चांगली आर्थिक कमाई करुन देत आहे.

मैठे यांच्या फूलशेती विषयी माहिती घेण्यासाठी नेहमीच महिलांच्या टिम व शेतकरी येत असतात. त्यांच्या फूलशेतीस जिल्हाधिकारी अरुण डोंगरे, ता. कृ. अ. सरदेशपांडे, जाधव मॅडम, जि. कृ. अ कृषी अधिकारी बी. आर. चलवदे, के. व्ही. के. चे डॉ. देविकांत देशमुख, आत्माचे चंद्रशेखर कदम यांच्या भेटीतून मार्गदर्शन मिळून त्यांच्याकडून संभाजी मैठे यांच्या फूलशेतीचे कौतूक होत आहे. जिल्हाधिकारी अरुण डोंगरे यांनी फूलझाडांच्या रोपवाटीकेसाठी एक लाख रुपयाचा निधी दिला असून संभाजी मैठे यांच्या मार्गदर्शनाने अनेक शेतकऱ्यांनी फूलशेती करण्यास सुरुवात केली आहे.

संपर्क : संभाजी नामदेवराव मैठे,
+९१ ९७३०५४७८२२
मु.पो. नाळेश्वर, ता-जि : नांदेड,
शब्दांकन :
डॉ. देवीकांत देशमुख-डोंगरगावकर,
+९१ ९४२३१४०५९८
(लेखक कृषि विज्ञान केंद्र पोखर्णी, नांदेड येथे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख म्हणून कार्यरत आहेत.)

ॲग्रोटेक
+९१ ९८६७९०६७६७

